| शिक्षण संचालनालय (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य | सत्यमेव जयते | Government of Maharashtra **DIRECTORATE OF EDUCATION** (Secondary & Higher Secondary) **Maharashtra State** |
|---|---|---|
| मध्यवर्ती इमारत, डॉ.ॲनी बेझंट मार्ग, पुणे-४११००१ | महाराष्ट्र शासन | Central Building, Dr.Annie Besant Road, Pune-1 |

w'site : education.maharashtra.gov.in Phone : (020) 2612 0361 e-mail : doecentralize11state@gmail.com

परिपत्रक

क्र.विद्या-ए-१/११.प्रवेश/२०२३/300६
दिनांक-१५/०६/२०२३

प्रति,
विभागीय शिक्षण उपसंचालक,
मुंबई, पुणे, नाशिक, अमरावती, नागपूर

**संदर्भ:- इ.११वी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया २०२३-२४ (इन-हाऊस कोटा, व्यवस्थापन कोटा, अल्पसंख्याक कोटा) कोटांतर्गत राखीव जागांवरील प्रवेशाबाबत.**

**संदर्भ:-** १.अल्पसंख्याक विभाग शासन निर्णय क्र.अशैस-२०१२/प्रक्र.२१/कार्या-५ दिनांक.२७/०५/२०१३
२.अल्पसंख्याक विभाग शासन निर्णय क्र.अशैस-२०१२/प्रक्र.२१/कार्या-५ दिनांक.१८/०६/२०१४
३. मा.उच्च न्यायालय मुंबई येथील WP-१७२६/२००१ निर्णय दिनांक.१२/१०/२०१७
४.शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. प्रवेश-२०१८/प्रक्र.३३३/एसडी-२ दि.०७/०३/२०१९
५.शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय पत्र क्र.प्रवेश-०४२२/प्रक्र.४१/एसडी-२ दिनांक.०९/०६/२०२२.

राज्यातील मुंबई महानगर क्षेत्र तसेच पुणे, पिंपरी-चिचवड, नाशिक, अमरावती, नागपूर महानगरपालिका क्षेत्रांतील इ.११वी चे प्रवेश केंद्रीय ऑनलाईन पद्धतीने करण्यात येत आहेत सदर प्रवेश प्रक्रियेअंतर्गत कोटा प्रवेशाबाबत शासन तरतूदींप्रमाणे खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत. त्यानुसार कार्यवाही करावी.

**उच्च माध्यमिक विद्यालय / कनिष्ठ महाविद्यालयांतील कोटा प्रवेशासाठीच्या सर्वसाधारण तरतूदी-**

- उच्च माध्यमिक विद्यालय / कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये केंद्रीय प्रवेशाचे (CAP) जागांशिवाय विद्यालय स्तरावरुन प्रवेशासाठी पुढीलप्रमाणे कोटांतर्गत काही (Quota) जागा राखीव असतील.
  a) **इनहाऊस कोटा-१०%** (संस्थेच्या माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांसाठी),
  b) **व्यवस्थापन कोटा-५%** (सर्वांसाठी), आणि
  c) **अल्पसंख्याक कोटा-५०%** (अल्पसंख्याक शाळांमध्ये, अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी).
- कोटांतर्गत राखीव (Quota Seats) जागांवरील प्रवेश विद्यालय स्तरावरुन विहित पद्धतीने ऑनलाईन केले जातील.
- कोटांतर्गत राखीव जागा वगळता उर्वरित (CAP Seats) जागांवरील प्रवेश केंद्रीय ऑनलाईन पद्धतीने करण्यात येतील.
- इन-हाऊस, व्यवस्थापन व अल्पसंख्याक कोटांतर्गत प्रवेश, प्रवेश प्रक्रियेच्या प्रत्येक फेरी/ टप्प्यावर करता येतील.
- अल्पसंख्याक कोटांतर्गत रिक्त जागा नियमित फेरी-३ पूर्ण झाले नंतरच CAP कडे प्रत्यार्पित करता येतील.
- इन-हाऊस व व्यवस्थापन कोटांतर्गत रिक्त जागांचे CAP कडे प्रत्यार्पण प्रवेश प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर करता येईल.
- कोटांतर्गत रिक्त जागांचे CAP कडे प्रत्यार्पण (अंशत: अथवा सर्व) विद्यालयांना त्यांचे इच्छेनुसार, जागा प्रत्यार्पनासाठी दिलेल्या वेळेत करता येईल.

**अल्पसंख्याक उच्च माध्यमिक विद्यालय / कनिष्ठ महाविद्यालयांतील अल्पसंख्याक कोटा प्रवेशाच्या तरतूदी-**

१. **अल्पसंख्याक कोटांतर्गत प्रवेश देण्याची कार्यपद्धती:-** धार्मिक/भाषिक अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांनी त्यांच्या प्रवेश क्षमतेच्या कमीत कमी ५० % जागांवर त्यांना प्राप्त झालेल्या अल्पसंख्याक दर्जाच्या समुहातील विद्यार्थ्यांना प्रवेशामध्ये अग्रक्रम (Priority) द्यावा. जर, संबंधित धार्मिक/भाषिक अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थेस उपरोक्त प्रमाणे त्यांच्या अल्पसंख्याक दर्जा प्राप्त समुहातील पुरेसे विद्यार्थी उपलब्ध झाले नाहीत, **तर पुढील प्रमाणे कार्यवाही करावी...**

२. **धार्मिक अल्पसंख्याक विद्यालये:-** धार्मिक अल्पसंख्याक संस्थांनी राज्य शासनाने घोषित केलेल्या अन्य धार्मिक अल्पसंख्याक समुहातील विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत आणि अन्य धार्मिक अल्पसंख्याक समुहातील विद्यार्थी देखील उपलब्ध न झाल्यास अल्पसंख्याक कोटयातील जागांवर भाषिक अल्पसंख्याक समुहातील विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत.
त्यानंतर सर्वकष प्रयत्न केल्यानंतर सुद्धा काही जागा रिक्त राहिल्यास रिक्त जागी बिगर अल्पसंख्याक षिद्यार्थ्यांना प्रवेशासाठी सदर जागा केंद्रीय प्रवेश प्रक्रियेकडे प्रत्यार्पित करता येतील.

३. **भाषिक अल्पसंख्याक विद्यालये:-** भाषिक अल्पसंख्याक संस्थांनी राज्य शासनाने घोषित केलेल्या अन्य भाषिक अल्पसंख्याक समुहातील विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत आणि अन्य भाषिक अल्पसंख्याक समुहातील विद्यार्थी देखील उपलब्ध न झाल्यास अल्पसंख्याक कोटयातील जागांवर धार्मिक अल्पसंख्याक समुहातील विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत.
त्यानंतर सर्वकष प्रयत्न केल्यानंतर सुद्धा काही जागा रिक्त राहिल्यास रिक्त जागी बिगर अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी सदर जागा केंद्रीय प्रवेश प्रक्रियेकडे प्रत्यार्पित करता येतील.

४. **अल्पसंख्याक कोटा प्रवेशासाठी पोर्टलवरील फेरीनिहाय सुविधा:-** अल्पसंख्याक विद्यालयात अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना संदर्भिय शासन निर्णयान्वये विहित क्रमानुसार प्रवेश दिले जावेत यासाठी :-

I. **नियमित फेरी-१** धार्मिक/भाषिक अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांना प्राप्त झालेल्या अल्पसंख्याक दर्जाच्या समुहातील विद्यार्थ्यांचे प्रवेश करणेची तरतूद करण्यात आली आहे. त्यानंतर, अल्पसंख्याक दर्जा प्राप्त समुहातील धार्मिक/भाषिक ५०% विद्यार्थी उपलब्ध झाले नाहीत, तर

II. **नियमित फेरी-२** मध्ये उक्त "2" व "3" अन्वये विहित पद्धतीनुसार इतर धार्मिक किंवा भाषिक (लागू असेल ते) अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याची सुविधा करण्यात येईल. आणि,

III. **नियमित फेरी-३** पासून अल्पसंख्याक कोटा जागेवर कोणत्याही अल्पसंख्याक विद्यार्थ्यास प्रवेश देता येतील.

५. **अल्पसंख्याक विद्यालयात अल्पसंख्याकांना प्रवेश देण्याबाबत:-** अल्पसंख्यांक कोटांतर्गत प्रवेशासाठी अल्पसंख्याक समुहातील विद्यार्थी अर्ज करण्यास पात्र असतील. अल्पसंख्याक कोटा-५०% केवळ अल्पसंख्याक उच्च माध्यमिक विद्यालयांमध्ये उपलब्ध असेल.

अल्पसंख्यांक संस्थांनी विहित कालमर्यादेत गुणवत्तेनुसार पारदर्शक प्रक्रियेद्वारे, त्यांना प्राप्त असलेल्या अल्पसंख्याक दर्जाच्या समुहाच्या सर्व पात्र अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना प्रवेश दिले पाहिजेत आणि कोणत्याही पात्र अल्पसंख्याक विद्यार्थ्यांचा अर्ज संस्थेने नाकारता कामा नये. तसेच अल्पसंख्याक कोटांतर्गत राखीव ठेवलेल्या जागा वेळेत भरणेसाठी विद्यालयांनी सर्वंकष प्रयत्न करावेत. तरीही काही जागा रिक्त राहिल्यास, या रिक्त जागी बिगर अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यासाठी सदर जागा नियमित फेरी-३ नंतर CAP केंद्रीय प्रवेश प्रक्रियेकडे प्रत्यार्पित करता येतील.

**कोटा प्रवेशासाठी पोर्टलवरील अतिरिक्त तरतूद:- (इन-हाऊस कोटा, व्यवस्थापन कोटा, अल्पसंख्याक कोटा)**

- कोटांतर्गत राखीव जागांवर प्रवेश मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांना त्यांच्या लॉगीनमध्ये ऑनलाईन Apply for Quota सुविधा देण्यात आलेली आहे. त्याद्वारे विद्यार्थी एका अथवा सर्व कोटांतर्गत प्रवेशासाठी पात्रतेनुसार विद्यालयांना ऑनलाईन पसंती नोंदवू शकतील. विद्यार्थ्यांना कोटांतर्गत प्रवेशासाठी यापेक्षा वेगळा अर्ज करण्याची आवश्यकता नाही.
- अशाप्रकारे ऑनलाईन Quota Apply केलेल्या सर्व विद्यार्थ्यांची कोटानिहाय यादी संबंधित विद्यालयांना ऑनलाईन दर्शविण्यात येईल. यामुळे कोटांतर्गत प्रवेशासाठी पात्र व इच्छुक असलेल्या विद्यार्थ्यांची यादी संबंधित विद्यालयांना उपलब्ध होईल. सदर यादीमधील अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांचे कोटांतर्गत राखीव जागांवर प्रवेश करणे विद्यालयांना सुलभ होईल.

**टीप-**

कोटा प्रवेशासाठी विद्यार्थ्याने प्रत्येक फेरीवेळी कोटा प्रवेशासाठी पसंती (Quota Choices) नव्याने नोंदविणे आवश्यक आहे.

उच्च माध्यमिक विद्यालय / कनिष्ठ महाविद्यालयांनी कोटांतर्गत देण्यात आलेले प्रवेश वेळापत्रकानुसार दिलेल्या वेळेत पोर्टलवर अपलोड करावेत.

**(प्रसाद कालगावकर)**
**सहायक संचालक**
(माध्यमिक व उच्च माध्यमिक)

**प्रत, माहितीस्तव,**
**विभागीय शिक्षण उपसंचालक,**
**औरंगाबाद, लातूर व कोल्हापूर**